**महाराष्ट्र शासन**

म. गृ. नि. व क्षे. प्राधिकरण
आवक क्र. 679
दिनांक 04 MAR 2017
अधिकाऱ्याची सही

क्र.विविचा-२००७/प्र.क्र.५१ (भाग-१)/गृनिप
गृहनिर्माण विभाग, मंत्रालय,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०३ मार्च,२०१७.

प्रति,

उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
तथा सदस्य सचिव,
शक्ती प्रदत्त समिती - बीडीडी चाळी पुनर्विकास,
गृहनिर्माण भवन, बांद्रा (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

**विषय :- म्हाडामार्फत मुंबई विकास विभाग (बीडीडी) चाळींच्या पुनर्विकासाबाबत दि.०३.११.२०१६ रोजी झालेल्या शक्ती प्रदत्त समितीच्या पाचव्या बैठकीचे इतिवृत्त मंजूर करणेबाबत.**

**संदर्भ :- आपले पत्र क्र. मुंमं/उमुअ/प्रनिस/न.क्र.बीडीडी-०७/२६९/१७, दि.१४.०२.२०१७.**

CO/MB
VP & CEO/A

महोदय,

उपरोक्त विषयाच्या संदर्भाधिन पत्रान्वये मुंबई विकास विभाग (बी.डी.डी.) चाळींच्या पुनर्विकासासाठी गठित शक्ती प्रदत्त समितीच्या दि.०३.११.२०१६ रोजी झालेल्या पाचव्या बैठकीच्या शासन मान्यतेस्तव सादर करण्यात आलेल्या इतिवृत्तास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. सदर इतिवृत्त निर्गमित करण्यात यावे, ही विनंती

आपला,

(सतीश खैरमोडे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

**विषय - म्हाडामार्फत मुंबई विकास विभाग [ बीडीडी ] चाळींच्या पुनर्विकासाबाबत दि.०३/११/२०१६ रोजी झालेल्या " शक्ती प्रदत्त समिती"च्या पाचव्या बैठकीचे इतिवृत्त मंजूर करणेबाबत.**

बीडीडी चाळीच्या पुनर्विकासाच्या संदर्भात गठित करण्यांत आलेल्या शक्ति प्रदत्त समितीची पाचवी बैठक दि.०३/११/२०१६ रोजी मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे अध्यक्षतेखाली मंत्रालयात त्यांचे बैठक कक्षात संपन्न झाली. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.के.पी.बक्षी | - मा. अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग |
| २. | श्री. डी.के. जैन | - मा. अप्पर मुख्य सचिव, वित्त विभाग |
| ३. | श्री.श्रीकांत सिंह | - मा. प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग |
| ४. | श्री. मनूकुमार श्रिवास्तव | - मा. प्रधान सचिव, (महसूल), महसूल व वन विभाग |
| ५. | डॉ. नितीन करीर | - मा. प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग |
| ६. | श्री.एस.एस.झेंडे | - मा.उपाध्यक्ष तथा मु.का.अ./ म्हाडा तथा सदस्य सचिव |
| ७. | श्री.चं. दे. चोरे | - उपायुक्त ( सु ) मनपा, मा. आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे प्रतिनिधी |

सदर बैठकीत चर्चा करावयाच्या मुद्दयांची कार्यसूची सन्माननीय सदस्यांना सादर करण्यात आली होती. त्या मुद्दयांच्या अनुषंगाने सांगोपांग चर्चा होऊन पुढील निर्णय घेण्यात आले.

| अ. क्र. | विषय | झालेली चर्चा व समितीचा झालेला निर्णय |
|---|---|---|
| १ | " शक्ती प्रदत्त समिती- बीडीडी चाळी पुनर्विकास " च्या तिस-या बैठकीचे इतिवृत्त स्थायी करणे. | तिस-या बैठकीचे इतिवृत्त स्थायी करण्यास सर्वानूमते मान्यता देण्यात आली. |
| २ | वरळी येथील बी.डी.डी. चाळींच्या पूनर्विकासाकरीता वास्तुशास्त्रज्ञ-सल्लागाराच्या नियुक्तीबाबत निर्णय घेणे. | या प्रकरणी महा अधिवक्ता ( Advocate General ) यांचे मत समितीच्या सदस्यांसमोर सादर करण्यात आले. वरळी येथील बीडीडी चाळीच्या प्रकल्पाचे काम वास्तुशास्त्रज्ञ श्री. विवेक भोळे यांचे दोन प्रकरणांपैकी (Two Cases) एका प्रकरणामध्ये महाअधिवक्ता यांनी प्रतिकुल (Negative) मत नोंदविले आहे, ही बाब सर्व समिती सदस्यांच्या निदर्शनास आणण्यात आली.<br>या प्रकल्पासाठी, वरळी प्रकल्पासाठी निवड झालेल्या वास्तुशास्त्रज्ञाच्या यादीतील अनुक्रमांक २ व ३ वरील वास्तुशास्त्रज्ञापैकी हे काम देण्यात यावे किंवा कसे याबाबत |

| | | |
|---|---|---|
| | | मा.मुख्य सचिव यांनी सदस्यांना अभिप्राय देण्याचे सुचित केले. वरळी, नायगांव, एन.एम.जोशी मार्ग येथील बी.डी.डी. प्रकल्पासाठी वास्तुशास्त्रज्ञ नियुक्त करण्याच्या कार्यवाही प्रसंगी नियुक्त ज्युरी मेंबरने काय मत नोंदविले याबाबत मा.मुख्य सचिव यांनी उपस्थित वास्तुशास्त्रज्ञ/ मुं.मं. यांचेकडे विचारणा केली. वास्तुशास्त्रज्ञ / मुं.मं. यांनी ज्युरी मेंबरने नोंदविलेले अभिप्राय समितीच्या सदस्यासमोर पुढीलप्रमाणे वाचून दाखविले :- <br><br> "i) None of the proponents had the strength in design proposals for giving all 3 projects or any two projects to any single proponent. <br> (ii) It was, therefore, felt desirable by the assessors to allot 3 projects to 3 different Architect/Proponents. This will also be appropriate considering the scale of the project and the manageability of the same." <br><br> या विषयाबाबत, वरळी बीडीडी प्रकल्पासाठी वास्तुशास्त्रज्ञ सल्लागार नेमण्यासाठी याबाबतच्या कायदेशीर प्रकरणांची अद्यावत माहिती घेऊन लघुनिविदा काढण्याबाबत योग्य ती कार्यवाही करणेत यावी, असे ठरले. |

या चर्चेनंतर मा.अध्यक्षांच्या अनुमतीने उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाल्याचे जाहीर करण्यात आले.

**उपाध्यक्ष तथा मु.का.अ./म्हाडा**
**तथा सदस्य सचिव / शक्ती प्रदत्त समिती**
**बीडीडी चाळी पुनर्विकास**

**मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन**
**तथा अध्यक्ष / शक्ती प्रदत्त समिती / बीडीडी चाळी पुनर्विकास**